तरुण भारत
Akola Main | 2025-09-10 | Page- 13
epaper.tarunbharat.net

# ग्राहकांनी केंद्रीय योजनांचा लाभ घ्यावा : सचिन शेंडे

## रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया व जिल्हा बँक यांच्या संयुक्त विद्यमाने री-केवायसी उपक्रम




ग्राहकांना मागदर्शन करताना आरबीआयचे सचिन शेंडे. सोबत डॉ. संतोष कोरपे व मान्यवर

**◆ अकोला, ९ सप्टेंबर**

केंद्र सरकार आपल्यासाठी अगदी नगण्य किमतीत प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना, प्रधानमंत्री जिवनज्योती विमा योजना व अटल पेन्शन योजना घेऊन आली आहे. आर्थिक समावेशनांतर्गत बँकिंग प्रवाहापासून दूर असलेल्या आर्थिक दुर्बल घटकातील लोकांना बँकिंगचे मुख्य प्रवाहामध्ये आणून शेवटच्या घटकाने त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन आरबीआयचे रिजनल डायरेक्टर सचिन शेंडे यांनी केले.

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया आपल्या दारी आली असून, आपण त्याचा लाभ घ्यावा असे बोरगांवमंजू येथे मंगळवार, ९ सप्टेंबर रोजी आयोजित कार्यक्रमामध्ये ते बोलत होते. प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना, प्रधानमंत्री जिवन ज्योती विमा योजना या दोन्ही योजनांचे हप्ते अगदी कमी असून दिवसाला केवळ सव्वा रुपया गुंतवून योजनेत सहभागी होता येते तर अन्य योजनात देखील अगदी सहजपणे सहभाग घेता येतो. या योजनेच्या लाभांसाठी खातेदारांनी आपले बँकेचे खात्याची रि-केवायसी करणे गरजेचे असते. यासाठीच आरबीआयने हा उपक्रम हाती घेतला असल्याचे ते पुढे बोलताना म्हणाले. यावेळी अकोला-वाशीम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष, डॉ.संतोषकुमार कोरपे कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी होते.

डॉ.संतोषकुमार कोरपे म्हणाले आर्थिक समावेशन आवश्यक असून, प्रत्येक माणू बँकेशी जुळलाच पाहीजे. अगदी लहानातला लहान माणूस योग्य रितीने जोडला तरच खऱ्या अर्थाने आर्थिक समावेशन होईल. यासाठी रि-केवायसीमध्ये आपले जिल्ह्याचे प्रमाण फार कमी आहे. म्हणूनच आरबीआय व जिल्हा बँकेकडून संयुक्त उपक्रम राबविले जात आहे. रि-केवायसी लवकरात लवकर करून तसेच केंद्र शासनाच्या सामाजिक सुरक्षा योजनेत जास्तीत जास्त लोकांनी सहभाग घ्यावा असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

या कार्यक्रमास पंकजकुमार, रिजनल व्यवस्थापक, सेंट्रल बँक ऑफ इंडिया, जिल्ह्याचे अग्रणी बँकेचे व्यवस्थापक नयन सिन्हा यांनी आर्थिक समावेशनबद्दलचे आपले मनोगतात व्यक्त केले. नाबार्डचे जिल्हा प्रबंधक श्रीराम वाघमारे, बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनंत वैद्य, सहा. व्यवस्थापक प्रसन्ना बोनथा तसेच बँकेचे अधिकारी कर्मचारी व ग्राहक, खातेदार, शेतकरी व महिला इ. मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच या अभियानाला बोरगाव मंजू परिसरातील नागरिकांनी मोठ्या प्रमाणात उपस्थित राहून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. प्रास्ताविक बँकेचे मुख्याधिकारी जी. एच. शिंदे यांनी केले तर आभार प्रदर्शन बँकेचे कार्यकारी अधिकारी अनंत वैद्य यांनी केले. *(तभा वृत्तसेवा)*

Powered by Bharati Web